नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ३०/०८/२०२२ (मंगळवार)**

**(सकाळ)**

---

## खून

**पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत २५ कि. मी अंतरावरील भोरगड येथे दिनांक २९/०८/२०२२ चे २०.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– विशाल सुखराम उईके, वय २२ वर्ष, रा. खैरी तायेगाव ता. सौसर, जि. छिंदवाडा म.प्र. हा मित्रासह मोबाईल बघत असता आरोपी नामे– आकाश जानराव सरेयाम, वय २६ वर्ष, रा. भोरगड याने 'बाहेरचे पोर गावात कसे येते साल्याले आता खतमच करतो' असे म्हणून हातात लाकडी झोडप घेवून आला व फिर्यादीस ठार मारण्याच्या उद्देशाने त्याचे डोक्यावर रट्टा मारून जखमी केले. तसेच तेथे उभे असलेला मधुकर गणपतराव परतेती(मृतक) वय ४४ वर्ष रा. भोरगड याला सुध्दा लाकडी झोडप्याने मारून त्याचा खून केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३०२,३०७,५०४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री दत्तात्रय कोलटे मो.क्र. ८८०५४४८४१७ हे करीत आहे.

## जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. खापा** :– अंतर्गत १२ कि.मी अंतरावर मौजा कोच्छी बॅरेक येथे दिनांक २९/०८/२०२२ चे १९.०० ते २०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– निरजंन गोविंदा पैठे वय ६७ वर्ष, रा.कोच्छी ता.सावनेर (धंदा सेक्युरीटी गार्ड डयुटी) यांची नाईट डयुटी असल्याने ते कोच्छी बॅरेक येथे गेले असता सिदार्थ फत्तु पाटील(जखमी), वय ४५ वर्ष, रा. लोकमत नगर नागपुर, ह.मु. कोच्छी हे बॅरेक मध्ये दिसले नाही. यावरून त्यांना आवाज दिला ते तेथे नव्हते म्हणुन आजुबाजुला पाहणी केली परंतु यावरून फिर्यादी याने त्याचा नातु– हिमांशु खंगार रा. कोच्छी याला फोन लावला असता फिर्यादीचे नातु व अनिल शेन्द्रे हे आले व तिघेही आजुबाजुला पाहणी केली असता बॅरेक जवळ असलेला निंबाचा झाडा जवळ ओरडन्याचा आवाज आला. त्यामुळे ते त्यांच्या जवळ गेले व पाहिले तर सिदार्थ पाटील हे जखमी अवस्थेत पडलेले दिसले. त्यांचे डोक्यावर, कानाजवळ, डावे डोळयाचे पापनीवर व हनुवटीवर मार लागल्याचे दिसले व सिदार्थ पाटील हे बेहोश असल्याने काही सांगितले नाही. यावरून गावातील काही लोकांचा मदतीने त्यांना उचलुन रोशन ढोबळे यांच्या स्कॉरपिओ गाडीमध्ये टाकुन सरकारी दवाखाना खापा येथे नेले व तेथील डॉक्टरांनी उपचारकरून त्याला जास्त मार असल्याने रेफर केल्याने त्याला ऍलेक्सीस हॉस्पिटल नागपुर येथे आपत्कालीन विभागात भरती आहे.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३०७ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री. केलगुरवार मो. क्र. ९१७५५७९१४३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर